महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:-पीटीसी-२०२६/प्र.क्र.४६ (अ)/टीएनटी-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ : सहसचिव (Inst. & Ting.) भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग यांचे अर्धशासकीय पत्र क्र.१-२५/२०२६-NAT.
दिनांक २१ ऑगस्ट, २०२६ चे पत्र व त्यासोबतचे सहपत्र.

परिपत्रक :-

प्रतिवर्षी केंद्र शासनाकडून विविध राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर केले जातात. सन २०२६ चे राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी सहा शिक्षकांची नामांकने प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि. ५ ऑगस्ट, २०२६ रोजी आयोजित ऑनलाईन बैठकीद्वारे अंतिम करुन ऑनलाईन पोर्टलद्वारे केंद्र शासनास कळविण्यात आली होती.

२. सन २०२६ च्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी राज्यातील १) डॉ. कविता नरसिंगराव गित्ते, (DR. KAVITA NARSINGRAO GITTE) साने गुरुजी निवासी विद्यालय केज, साने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय, केज, धारूर रोड, केज, महाराष्ट्र २) श्रीमती कुंदा जयवंत बच्छाव (MS. KUNDA JAYAWANT BACHHAV) एनएमसी स्कुल नं.१८, आनंदवल्ली, नाशिक, महाराष्ट्र आनंदवल्ली या दोन शिक्षकांची निवड केल्याचे केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दि. २१ ऑगस्ट, २०२६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

३. राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे दि. ०५ सप्टेंबर, २०२६ रोजी होणार आहे.

४. सदर पुरस्कार्थी निवासाबाबतची माहिती संचालक, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, नवी दिल्ली यांच्या दि. २१ ऑगस्ट, २०२६ रोजीच्या पत्रात नमूद केल्यानुसार राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार्थी यांना कळविण्याची कार्यवाही शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२६०८२५१३०९४०४८४९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

SANGITA RAJ SHROFF

Digitally signed by SANGITA RAJ SHROFF
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=DCA472F80F7FF22C48067137B194FDAC382A2CE5DB9C19B1D0EA93F06F553269, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D087701DBDEF3F3DE20D3E32DFBCB198D211AAD42682ABE80B1419FB4E5B3B19, cn=SANGITA RAJ SHROFF
Date: 2026.08.25 13:10:40 +05'30'

(संगिता रा. श्रॉफ)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
५. सर्व जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना) / सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई.

६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
७. मा. मंत्री, शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
८. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड/लातूर यांना शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत.
१२. पुरस्कार विजेते शिक्षक यांना शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत.
१३. निवड नस्ती (टीएनटी-४).